कुठे गेले हे पदार्थ?
पण बोलणार आहे!
मग मी काय करू?
व्हू पॉइंट
बाटलीतल्या राक्षसिणीचं मनोगत
प्रतिसाद
स्मरण कारगिलचं!
'जिव्हाळ्याची ई-बेटं'
थँक्यू मॅडम
स्त्री हितकारिणी
परिवार मंगलम्
चिकन सूप...
मनाला सुविचाराची साथ
'ती'चं मनोगत
कोवळी पालवी
चाफ्याच्या झाडा..
भावगीतांची मोहरलेली गुहा
वेलीवरचा खोपा आणि खारीचा वाटा
खूबलेई शिलाँग!
अमेरिकन रामायण

**थँक्यू मॅडम**




माझे आई-वडील शाळेत कधीच गेले नाहीत. त्या अर्थाने ते तसे अशिक्षितच, पण आपल्या मुलाबाळांना सर्वोत्तम शाळेतलं शिक्षण मिळावं याविषयी मात्र ते खूप जागरूक होते. विशेषतः माझी आई तर त्या दिशेनं प्रत्यक्षात कार्यरतही होती. म्हणूनच तर उत्तर प्रदेशातील 'बरेली'ला तिनं मला आवर्जून पाठवलं होतं, त्या काळातल्या तिथल्या एका सवरेत्कृष्ट शाळेत शिकण्यासाठी. त्या शाळेचं नाव होतं सेंट मारिया गोरेट्टी कॉन्व्हेंट स्कूल. या शाळेत मुलं आणि मुली एकत्र शिकत होती. इथल्या सर्वच शिक्षिका सेवाभावी होत्या. धडपड्या होत्या. माझ्या वर्गात त्या वेळी नऊ मुली आणि तीन मुले होती. या एकूण १२ विद्यार्थ्यांपैकी तिघाजणांनी 'प्रगत अंकगणित' हा विषय सीनिअर केंब्रिजच्या परीक्षेसाठी घेतला होता आणि मला सांगायला खूप अभिमान वाटतोय की, त्या तिघांपैकी मीही एक होतो! शाळेत मिसेस फ्रे नावाच्या एक शिक्षिका आम्हाला गणित हा विषय शिकवत असत. काय गंमत आहे बघा, अद्यापही मला त्यांचे पहिले नाव माहीत नाहीए! 'फ्रे मॅडम' या नावानेच आम्ही त्यांना ओळखत असू. आम्ही तिघे गणिताचे विद्यार्थी आणि फ्रे मॅडम एकत्रितपणे एका टेबलाभोवती बसून चर्चा करीत करीत, कृती करीत करीत शिकत असू. खरे तर गणितात त्या अत्यंत हुशार! पण तरीही अगदी पहिल्याच दिवशी त्यांनी आम्हाला सांगितलं होतं, ''हे बघा मुलांनो, मला गणितातलं तसं काही फारसं समजत नाही. तेव्हा गणिताबाबत तुम्ही माझ्याकडून फारशा काही अपेक्षा ठेवू नका. बरंचसं काम तुमचं तुम्हांलाच करावं लागणार आहे. शिवाय तुम्ही हुशार आहातच. तेव्हा एकमेकांची मदत घ्या, अन् सुरू करा.''

Kiva Microfinance

"Loans that Change Lives."
Make a Difference and Lend Today!

www.kiva.org

Google द्वारा सार्वजनिक सेवा जाहिराती

विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याची आणि त्यांना कामाला लावायची किती छान पद्धत! मॅडमना हेही छान माहीत होतं की, गणितात मला चांगली गती आहे, पण इंग्रजीत मात्र मी थोडासा मागे पडतोय. मग त्यांनी काय करावं? त्या माझ्याशी सतत इंग्रजीतून बोलू लागल्या. अगदी तासन्तास. इतकेच नव्हे तर इंग्रजी भाषेतलं साहित्य मी अधिक वाचावं यासाठी त्या मला सतत प्रोत्साहन देत असत. त्या मला पुनःपुन्हा म्हणायच्या. ''अरविंद माझा तुझ्यावर विश्वास आहे. तू हे नक्की करू शकशील. तुला ते जमेल.'' आणि काय आश्चर्य, त्यांच्या या प्रेरणेमुळेच तर मी इंग्रजीत उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालो.

आज इतकी वर्षे उलटली आहेत, पण 'एक सर्वोत्तम शिक्षिका' म्हणून मिसेस फ्रे यांचेच नाव आजही सर्वप्रथम माझ्या मनात डोकावतं. आपलं काम प्रामाणिकपणानं करण्याचं धैर्य त्यांच्याकडे खचितच होतं. त्यांनीच तर मला जीवनाभिमुख शिक्षणाचे धडे दिले. अगदी सातत्याने आपलं घर, शाळा, परिसर, परिसरात घडणाऱ्या घटना या साऱ्यांचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी जोडण्याचं त्यांचं कसब तर केवळ अवर्णनीयच होतं. एकदा काय झालं.. एकदा आम्ही सहा पृष्ठभागांच्या सहाय्याने घनाकृती बनवण्याचे काम करीत होतो. त्यासाठी कागदावर निरनिराळ्या रचना करून पाहत होतो. या रचनांना नेट (NET) असे म्हणतात. एकच घनाकृती करायला अनेक प्रकारच्या नेटस्चा उपयोग करता येतो, हे आम्हाला समजायला लागलं होतं. थोड्या वेळानं आमच्या असंही लक्षात आलं की, आम्ही भरपूर म्हणजे अगदी ३०/३५ रचना करू शकतो. एवढं झाल्यावर मग फ्रे मॅडमनी आम्हाला विचारलं. ''आता घन (Cube) तयार करण्यासाठी यातली कोणकोणती नेटवर्कस् वापरता येणं शक्य आहे?'' झालं; पुन्हा एकदा आम्ही कामाला लागलो. आता आम्ही प्रत्यक्षात आकृत्या काढणं, त्या योग्य प्रकारे कापणं, नंतर त्या त्या कटिंग्जवर घड्या घालणं या गोष्टी करायला सुरुवात केली. आता एकीकडे आमच्या डोक्याला खाद्य मिळालं होतं तर त्याच वेळी आमच्या हातांना काम मिळालं होतं. फारच रमून गेलो होतो आम्ही त्यात. खूप मजा वाटत होती. शिवाय त्यातून बरंच काही शिकणंही घडत होतं; अगदी आपोआप; तेही हसत-खेळत; आनंददायी पद्धतीनं. मला आतासुद्धा अगदी स्पष्टपणानं आठवतंय की, त्याच काळात माझ्या रसायनशास्त्राच्या शिक्षिका मात्र केवळ घोकंपट्टीवरच भर देत होत्या; निर्थक, कंटाळवाणी घोकंपट्टी. खरंच, किती ग्रेट होत्या आमच्या गणिताच्या मॅडम! फ्रे मॅडम!! त्यांनीच तर आम्हाला नुसत्या गणिताऐवजी 'प्रयोग'

Best Jobs
click here

Flowers & Gifts
Send flowers & Gifts

Send Flowers to india

Express Astrology
Know what's in the stars for you

Express

**Classifieds**
Post and view free classifieds ad

**Advertise with us**

करायला, ‘कृती’ करायला शिकवलं.

मिसेस फ्रे यांना एक मुलगा होता. त्याचं नाव डेव्हिड. तो नैनितालच्या विख्यात ‘शेरवूड’ स्कूलमध्ये शिकत होता. मी आणि डेव्हिड, तसे आम्ही दोघे समवयस्कच होतो. त्या वेळी माझी फायनल सिनिअर केंब्रिजची परीक्षा अगदी तोंडावर आली होती. एके दिवशी फ्रे मॅडम आमच्या घरी आल्या; अगदी अचानकच. त्यांच्याबरोबर डेव्हिडही होता. खरे तर आमच्या घरापर्यंत पोहोचणं तसं सोपं नव्हतं. अनेक छोटे मोठे रस्ते, अरुंद गल्ल्या यांचं जाळं ओलांडून घरापर्यंत यावं लागे. त्यातून पहिल्यांदाच त्या आमच्या घरी आल्या होत्या. म्हणूनच त्या कशा काय त्या जंजाळातून आमच्या घरी पोहोचल्या, हे खरं तर मला आजपर्यंत न उलगडलेलं कोडंच आहे! माझी बहीणसुद्धा मिसेस फ्रे यांची पूर्वीची विद्यार्थिनी होती. तिनं आणि मी जेव्हा आमच्या घराच्या दारात फ्रे मॅडमना पाहिलं तेव्हा आम्हा दोघांनाही खूप आनंद झाला; खूप म्हणजे खूपच! आम्ही अगदी मनापासून त्यांचं स्वागत केलं. आत येताच मॅडमनी सांगून टाकलं; ‘‘अरविंद, डेव्हिडला गणितातले काही प्रश्न सुटत नाहीयेत. तेव्हा मी ठरवलं की, त्याला आपल्या सर्वोत्तम, कुशाग्र अशा दोन विद्यार्थ्यांकडे घेऊन जावं; म्हणूनच अरविंद मी आता तुझ्याकडे आले आहे.’’ कल्पना करा, मॅडमचं हे बोलणं ऐकून काय वाटलं असेल आम्हाला? त्या क्षणी मी आणि माझी बहीण, आम्ही दोघंही जणू जगातल्या सर्वोच्च सिंहासनावर आरूढ झालो होतो!

तुम्हाला खरंच सांगतो, माझ्या आईप्रमाणेच माझ्या या गणिताच्या शिक्षिकेनं- फ्रे मॅडम यांनी मला माझ्या आत्मसन्मानाची जाणीव करून दिली होती. ‘आपण जीवनात काहीतरी सर्वोत्तम करू शकतो’, याचं बीज त्यांनी माझ्या मनात पेरलं होतं. त्या ‘स्व’च्या जाणिवेमुळेच तर आयआयटीची- मोठ्या सन्मानाची डिग्री- माझ्याकडे असूनही मी मात्र अगदी वेगळा जीवनमार्ग स्वीकारला. तुमचा विश्वास बसणार नाही, पण खरंच गेली ३० वर्ष मी सातत्याने एकच काम करत आलोय अन् ते म्हणजे माझ्या देशातल्या जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना शाळेतला त्यांचा विज्ञान हा विषय मनोरंजक कसा वाटेल, प्रत्यक्ष अनुभव घेऊन ते हा विषय कसा शिकतील, यासाठी प्रयत्न करीत राहायचे. हे करताना खर्च झालेले माझ्या आयुष्यातील प्रत्येक मिनीट मला आवडतं. हे घडू शकलं ते केवळ फ्रे मॅडमनी दिलेल्या प्रेरणेमुळेच.

‘‘थँक्यू फ्रे मॅडम, तुम्हीच तर मला माझ्यातल्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचं बळ दिलंत. माझ्यातल्या ‘स्व’ची जाणीव करून दिलीत. थँक्यू वन्स अगेन.’’

**अरविंद गुप्ता**

**अनुवाद - प्रकाश गोपाळ बोकील**